# THE POONA SCHOOL AND HOME FOR THE BLIND TRUST

14/17, Koregaon Park, Dr. S.R. Machave Road,
Pune: 411 001 Tel. (020) 26122686







# पुणे अंधशाळेचे संस्थापक



# मा. डॉ. शंकर रामकृष्ण माचवे

(१० ऑक्टोबर १८९० ते २१ नोव्हेंबर १९६९)

# मनोगत



दृष्टिहिनांचे शिक्षण, प्रशिक्षण आणि पुनर्वसनांचे कार्य पुणे अंधशाळा १९३४ पासून करत आहे. संस्थेचे हजारो दृष्टिहिन विद्यार्थी समाजाच्या मुख्य प्रवाहात आले आहेत. स्वाभिमानी आणि स्वावलंबी जीवन जगत आहेत. संस्था दृष्टिहिन मुलांच्या उपलब्ध शक्तीचा अधिकाधिक वापर करुन घेण्याची संधी त्यांना देते. त्यामुळे त्यांच्यातील आत्मविश्वास वाढण्यास मदत होते. संस्थेतील प्रत्येक विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात संस्थेतील प्रत्येक घटकाचा वाटा आहे.

दृष्टिहिन मुलांची सुप्त शक्ती ओळखून त्यांची आवड व क्षमता ओळखून त्यांच्या विकासाला संस्था नवी दिशा व संधी देते. त्याच्यातील उपलब्ध शक्तीत रुपांतर करण्याचा संस्थेचा प्रयत्न नेहमीच असतो. त्यामुळे समाजातील विविध क्षेत्रात आमच्या विद्यार्थ्यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटविला आहे. शासकीय, निमशासकीय आणि खाजगी क्षेत्रात विविध पदावर विद्यार्थी कार्यरत आहेत. स्वंयरोजगारात देखील ते मागे नाहीत. सर्वसामान्यांनी देखील त्यांचेकडून प्रेरणा घ्यावी असे या विद्यार्थ्यांचे कार्य आहे. देशाचे जबाबदार नागरिक म्हणून विद्यार्थी घडल्याचे पाहताना मन भरुन येते.

जन्मत:च दु:ख घेवून जन्माला आलेल्या या मुलांच्या चेहऱ्यावरील हास्य संस्थेतून बाहेर पडताना पाहिल्यानंतर समाधान वाटते. वाढत्या स्पर्धेला सामोरे जाणारा विद्यार्थी घडविण्यासाठी संस्था नेहमीच विविध उपक्रम राबविते. संस्थेचे देणगीदार, शिक्षकेत्तर कर्मचारी, हितचिंतक यांच्या सहकार्याशिवाय हे शक्य नाही. संस्थेचे संस्थापक कै. डॉ. एस. आर. माचवे व त्यानंतर त्यांच्या कार्याची धुरा सांभाळणारे संस्थेचे माजी अध्यक्ष प्रतापराव पवार यांनी संस्थेला दिलेले योगदान विसरता येणार नाही. पवार साहेबांच्या काळातच संस्थेतील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या स्वातंत्र्याची यशोगाथा या नाटकाची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद झाली. डॉ. माचवे व पवारसाहेब यांच्या कार्याचा वसा घेवूनच मी अध्यक्ष या नात्याने खारीचा वाटा उचलण्याचा प्रयत्न करत आहे.

**अभिजीत पवार**

(अध्यक्ष पुणे अंधशाळा)

# 83rd Annual Report 2016-2017

Institute of

**THE POONA SCHOOL & HOME FOR THE BLIND TRUST**
14/17, Koregaon Park, Dr. S.R. Machave Road, Pune: 411 001 Tel. (020) 26122686

**THE POONA SCHOOL & HOME FOR THE BLIND BOYS**
14/17, Koregaon Park, Dr. S.R. Machave Road, Pune: 411 001 Tel. (020) 26122686

**THE SHIRDI SAI-BABA NURSERY**
14/17, Koregaon Park, Dr. S.R. Machave Road, Pune: 411 001 Tel. (020) 26122686

**THE POONA SCHOOL & HOME FOR THE BLIND GIRLS**
Near Gandhi Bhavan, Kothrud, Pune: 411 038 Tel. (020) 25384589

**THE POONA SCHOOL & HOME FOR THE BLIND**
Girls (Vocational ) Training Center Near Gandhi Bhavan,
Kothrud, Pune: 411 038 Tel. (020) 25384589

**THE POONA SCHOOL & HOME FOR THE BLIND**
**Teachers Training Center(D.SE.(VI) Two years course**
14/17, Koregaon Park, Dr. S.R. Machave Road, Pune: 411 001
Tel. (020) 26053195

# The Poona School & Home for the Blind Trust

Establishment : 28th Feb. 1934
Founder: LATE DR. S.R. MACHAVE
Ph. No. 020- 26122686
www.puneblindschool.org/ admin@puneblindschool.org

## MEMBERS OF MANAGING COMMITTEE

1) **Mr. Abhijit Pawar** Chairman
2) **Mr. Mahendra Pisal** Secretary
3) **Mrs. Mrunalini Pawar** Treasurer
4) **Mr. Jaydeep Mane** Co.Treasurer
5) **Mrs. Bharati Pawar** Managing Committee Member
6) **Mr. Sumiran Mehta** Managing Committee Member
7) **Mr. Vasudev Medankar** Managing Committee Member
8) **Mr. Abhay Mane** Managing Committee Member

## Staff: Name & Designation

| SR.NO. | NAME | DESIGNATION |
|---|---|---|
| 1 | Mr. Krishna Shewale | Administrative Officer |
| 2 | Mr. Ravindra Bamne | Accountant |
| 3 | Mr Vinayak Vishnu Dhawale | Accountant |
| 4 | Mrs. Rekha Raut | Special Teacher |
| 5 | Mr. Amrut Lokhande | Special Teacher |
| 6 | Miss. Humasamarin Shaha | Special Teacher |
| 7 | Mr. Santosh Jagtap | Music Teacher |
| 8 | Mrs. Prabha Nimbre | Care Taker |
| 9 | Mrs. Anita Chalwadi | Care Taker |
| 10 | Miss. Kalabai Chavan | Care Taker |
| 11 | Mrs. Sheetal Gaikwad | Care Taker |

| SR.NO. | NAME | DESIGNATION |
|---|---|---|
| 12 | Smt. Shalini Dawande | Care Taker |
| 13 | Mrs. Vidya Gajare | Instructor |
| 14 | Mr. Sidram S. Jakkapalli | Instructor |
| 15 | Ms. Bhavana P. Sabade | Music Teacher |
| 16 | Mrs. Snehal G. Madiwale | Instructor |
| 17 | Ms. Radhika A. Gore | Special Teacher |
| 18 | Ms. Mayuri R. More | Computer Teacher |
| 19 | Mrs. Savita V. Shinde | Instructor |
| 20 | Mrs. Archana R. Kamble | Care Taker |
| 21 | Smt. Suvarna Wagh | Care Taker |
| 22 | Mrs. Sangeeta V. Shinde | Care Taker |
| 23 | Smt. Surekha L. Landge | Sweeper |
| 24 | Vilas S. Shinde | Driver |
| 25 | Vaishali Bhimpure | Physio Therapist |
| 26 | Dr. Gayatri Mane | Dietitian |
| 27 | Ranjana Shrimangale | Teacher |
| 28 | Swapna Pargaonkar | Dance Teacher |
| 29 | Draupadi Yadav | Warden |
| 30 | Kranti Lambe | Care Taker |

# THE POONA SCHOOL & HOME FOR THE BLIND BOYS
# 14/17, KOREGAON PARK, PUNE : 411 001

## TEACHING STAFF

| SR.NO. | NAME OF EMPLOYEE | DESIGNATION |
|---|---|---|
| 1 | Mr. Chandrakant Waman Bhosale | Principal |
| 2 | Smt. Pratibha Ramchandra Korpe | Spl. Teacher |
| 3 | Mr. Rajaram Maruti Jagtap | Spl. Teacher |
| 4 | Mr. Damodar Narsappa Sargam | Spl. Teacher |
| 5 | Mrs.Bharati Ravindra Chobharkar | Spl. Teacher |
| 6 | Mr. Ganesh Shamrao Patil | Spl. Teacher |
| 7 | Mrs. Manisha Sanjay Shewale | Spl. Teacher |
| 8 | Mrs. Sangita Sadanand Mate | Music Teacher |
| 9 | Mr. Rajendra Pandurang Sutar | Phy. Edn. Instructor |
| 10 | Mr. Sandeep Dnyandeo Jagadale | Social |

| SR.NO. | NAME OF EMPLOYEE | DESIGNATION |
|---|---|---|
| 1 | Mr. Ruidas Rajaram Kuchekar | Jr. Clerk |
| 2 | Mr. Dattatray Dashrath Tikone | Asst. Cook |
| 3 | Mrs. Laxmi Narsappa Swami | Asst. Cook |
| 4 | Mrs. Nagamma Narayan Vardha | Maid Servant |
| 5 | Mrs. Kusum Suresh Patkar | Maid Servant |
| 6 | Miss. Yogita Datta Pawar | Care taker |
| 7 | Mr. Subhash S. Sherikar | Driver |
| 8 | Mr. Bhagwan Einath Giri | Cook |
| 9 | Mr.Suresh Rajaram Jalalwad | Watchman |

| SR.NO. | NAME OF EMPLOYEE | DESIGNATION |
|---|---|---|
| 11 | Mr. Ashok Bhima Kedari | Care taker |
| 12 | Mr. Laxman Mahadu Korwan | Care taker |
| 13 | Mr. Nitten Satyawan Kharat | Care taker |
| 14 | Dr. Sanjay Naik | V.M.O. |

# THE POONA SCHOOL & HOME FOR THE BLIND GIRLS TRAINING CENTRE KOTHRUD, PUNE- 411 038

## STAFF LIST

| SR.NO. | NAME OF EMPLOYEE | DESIGNATION |
|---|---|---|
| 1 | Mrs Varsha Mahendra Ranka | Prabharl ukhyadhyapika |
| 2 | Mrs Jayshree Anand Thatte | Special Teacher |
| 3 | Mr Zhumber Narayan Ernak | Special Teacher |
| 4 | Mrs Ujjwala Narayan Soni | Special Teacher |
| 5 | Ms Varsha Dattatrya Gulavani | Senior Clerk |
| 6 | Mr Naresh Pyarelal Pardeshi | Junior clerk |
| 7 | Mrs Savita Sagar Waghmare | Social Worker |
| 8 | Ms Pratibha Sakharam Zagade | Metron |
| 9 | Mrs Tejabail Hulram More | Cook |
| 10 | Mr Leeladhar Ramkrushna Gurav | Caretaker |
| 11 | Mrs Sulochana Bhagwan Hirve | Maidservant |
| 12 | Mr Balu Dashrath Katke | Caretaker |
| 13 | Mrs Vrushali Naik | Visiting Medical officer |

# THE POONA SCHOOL & HOME FOR THE BLIND GIRLS TRAINING CENTRE KOTHRUD, PUNE- 411 038

## STAFF LIST

| SR.NO. | NAME OF EMPLOYEE | DESIGNATION |
|---|---|---|
| 1 | Mr. Raju Dattatray Nandal | Handloom Instructor |
| 2 | Smt. Chandrakala Suryabhan Dhamale | Cook |
| 3 | Smt. Padma Chinnaswami Pillaye | Workshop Attendent |
| 4 | Mrs. Tarabai Vishnu Awate | Maid Servant |
| 5 | Mr. Maroti Keraba Waghmare | Watchman |

सत्यमेव जयते

# नोंदणी प्रमाणपत्र

यांद्वारे असे प्रमाणित करण्यात येते की,

खाली वर्णन केलेली सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था ही आज,

मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम,

१९५० (सन १९५० च्या मुंबई अधिनियम २९) अन्वये पुणे विभाग, पुणे

येथील सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचे नाव

**दि पुना स्कूल ॲन्ड होम फॉर दि ब्लाईंड**

१४/१७, कोरेगांव पार्क, डॉ. एस. आर. माचवे रोड, पुणे ४११ ००१

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांच्या नोंदणीपुस्तकातील क्रमांक – एफ १८६९५

(पुणे) मिसेस एम. डी. देसाई यांस प्रमाणपत्र दिले.

आज दि. ०७–०५–२००३ रोजी माझ्या सहीनिशी दिले.

**शिक्का**

**मान्धाता झोडगे**
संस्थेचे सहायक निबंधक,
पुणे विभाग

सत्यमेव जयते

# नोंदणी प्रमाणपत्र

**संस्था नोंदणी अधिनियम, १८६०**
**(१८६० चा अधिनियम २१)**

**नोंदणी क्रमांक**
**महाराष्ट्र/१९३/२००३/पुणे**

याद्वारे असे प्रमाणित करण्यात येते की,
**दि पुना स्कूल अ‍ॅन्ड होम फॉर दि ब्लाईंड**
१४/१७, कोरेगांव पार्क, डॉ. एस. आर. माचवे रोड, पुणे ४११ ००१

खालील तारखेस संस्था नोंदणी अधिनियम, १८६० (सन १८६० चा अधिनियम २१) अन्वये योग्यरित्या नोंदणी करण्यात आली.

तारीख २५-०२-२००३ रोजी माझ्या सहीनिशी दिले.

शिक्का

**मान्धाता झोडगे**
संस्थेचे सहायक निबंधक,
पुणे विभाग

**OFFICE OF THE COMMISSIONER OF INCOME TAX-IV**
**60/61, PRAPTIKAR SADAN, ANNEX BUILDING,**
**ERANDWANA,PUNE-4110004**
**TeleFax.: 020 25412215**

No.PN/CIT-IV/T&J/80G/2/2012-13 /88 \ Date:-21/06/2012

To,
The Secretary,
**The Poona School & Home For The Blind Trust,**
14-17, Koregaon Park,
Dr. S.R. Machave Road,
Pune- 411 001.

Sir,

Sub : Your application for renewal of approval U/s. 80G of the Income Tax Act,1961-reg-

Please refer to your application dated 13/04/2012 on the above subject.

2 From the annexures to the application, it is noticed that your Trust was approved U/s. 80G of the Income tax Act,1961 for the period 01.04.2007 to 31.03.2010 vide order dated 02.11.2007.

3 As per CBDT, New Delhi's Circular No.07 of 2010, existing approvals expiring on or after 01.10.2009 shall be deemed to have been extended in perpetuity unless it is withdrawn. In your case, the approval U/s. 80G of the Income tax Act,1961 is valid for the period after 1st October, 2009. In view of this position, I am directed to inform that the approval U/s. 80G granted in your case shall be deemed to have been extended *in* perpetuity unless specifically withdrawn.

Yours faithfully,

**(P.R. Chadha)**
Income tax Officer (T&J)
For Commissioner of Income tax-IV,Pune

No. E/17-19/62
Office of the Charity Commissioner,
Bank of India
Bldg. , 3rd Floor,
Flora Fountain, Fort, Bombay 1.

# Certificate

This is to certify that, ***The Poona School & Home For the Blind*** is registered under the Public Trust Act 1950 under N0. F-161 (Bom.) with the Public Trust Registration Officer, Gr. Bombay Region Bombay. It is further certified that, 'The Poona School And Home For the Blind is non- Cornmun Charitable institution.

Given under the seal of the Charity Commissioner, Maharashtra State, Bombay.
This twenty seventh day of August, nineteen hundred and sixty two.

(Sd/-)
for Charity Commissioner,

Maharashtra State, Bombay

27/ 8/ 1 962

**No. 0300004742016**
**Government of India**
**Ministry of Home Affairs**
**Foreigners Division**
**(FCRA Wing)**

NDCC-II Building, Jai Singh Road,
New Delhi-110001

**Dated: 06-08-2016**

To,
**The Chief Functionary,**
**The Poona School and Home for the Blind Trust**
**14-17,KOREGAON PARK,DR.S R MACHAVE ROAD,PUNE-411001, MAHARASHTRA, PUNE, Maharashtra, Pune, 411001**

**Subject: Renewal of Registration under Foreign Contribution (Regulation) Act,**

Sir/Madam

With reference to your application dated **21-01-2016** seeking renewal of registration under the Foreign Contribution (Regulation) Act, 2010, I am directed to convey the approval of competent authority for renewal of registration of your Association in terms of the provisions contained in Section 16 of Foreign Contribution (Regulation) Act, 2010 read with Rule 12 of Foreign Contribution (Regulation) Rules, 2011 as amended from time to time, as follows:-

Registration Number **083930478**

Nature : **Educational,Social**

2. The association shall receive foreign contribution only in its designated/exclusive bank account **000501049001** in **I.C.I.C.I. Bank, A WING,SHANGRILLA,BUND GARDEN ROAD, PUNE-411001, PUNE, Maharashtra, Pune, 411001** as mentioned in its application for online application for grant of renewal of registration.

3. In terms of section 18 of the Foreign Contribution (Regulation) Act, 2010 read with Rules 17 of the Foreign Contribution (Regulation) Rules, 2011, as amended from time to time, you are advised to furnish intimations online within the prescribed time to the Central Government of the amounts of each foreign contribution received by you, the source and the manner in which the foreign contribution was utilised, as per the provisions of the Act and the Rules. An association is required to furnish the return even when the particulars are 'NIL'. The FC-4 form is required to be submitted online on this Ministry's website https://fcraonline.nic. The Bank Account mentioned in your application should be used for receiving foreign contribution and no other amount should be credited to this account. The Association should immediately intimate online, within 15 days, in Form FC-6 to this Ministry regarding any change in the name of the Association, aims and objects, its address and Bank/Bank Account.

4. The association cannot bring out any publication (registered under PRB Act, 1867) or act as correspondent, columnist, editor, printer or publisher of a registered newspaper or engage in the production or broadcast of audio news or audio visual news or current affairs programmes through electronic mode or any other electronic form or any other mode of mass communication at a later stage thereby attracting provisions of the Section 3(1) (g) and (h) of the FC(R) Act, 2010. In addition to this, the association is forbidden from getting involved in any activity of political nature.

5. You are requested to note the provisions of Section 7 of FC(R) Act, 2010 and Rule 24 of FC(R) Rules, 2011 and ensure that before any funds are passed on to any person/association in India that the recipient is (i) eligible to accept foreign contribution under the Act, i.e., recipient association is registered under the Act, or has obtained Prior Permission of the Government under Section 11 of the Act, and (ii) the person/association is not prohibited under the Act.

6. Physical inspection of the activities done by the Association may be carried out at any time by this Ministry.

7. You are requested to familiarize yourself with the provisions of Foreign Contribution (Regulation) Act, 2010 and Foreign Contribution (Regulation) Rules, 2011, as amended from time to time, available at this Ministry's website https://fcraonline.nic.in/ to ensure strict compliance of the Act/ Rules. Failure to comply with any of the provisions of said Act/ Rules will make you liable for action under the relevant provisions of the Foreign Contribution (Regulation) Act, 2010.

8. This renewed certificate is valid for a period of five years with effect from **01-11-2016**.

9. The email containing the renewed registration certificate may be sent immediately to the Bank mentioned above.

10. The renewal of registration is subject to compliance of the provisions of Foreign Contribution (Regulation) Act, 2010/ Foreign Contribution (Regulation) Rules, 2011, as amended from time to time, by the association and also to the final outcome of enquiry/ case, if any, pending against the association.

11. This is a digitally signed certificate to be validated digitally using the signature panel using Adobe Acrobat Reader (Ver 5.0 or above). The digital intimation is authenticated by a digital signature obtained from a certifying authority under the Information Technology Act 2000.

12. Banks are requested to verify online the validity of the certificate using fcraonline.nic.in.

Yours faithfully

**Rajalakshmi Devaraj**
**Director**
**Tel. 01123438245**

# पुणे मुलांची अंधशाळा
# वार्षिक अहवाल-२०१६-१७

**दि. ११ एप्रिल, २०१६ - महात्मा फुले जयंती** - प्रतिवर्षी प्रमाणे या वर्षीही महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली. दुपारी ४.०० वाजता कार्यक्रमाला सुरूवात झाली. प्रथम महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन मा. प्राचार्य श्री. चंद्रकांत भोसले यांनी केले व सूत्रसंचालन सौ. मनिषा शेवाळे यांनी केले. महात्मा फुले यांची माहिती श्री. दामोदर सरगम, श्री. राजाराम जगताप व श्रीमती प्रतिभा कोरपे यांनी सांगितली. सौ. संगिता माटे यांनी सकाळ वृतपत्रातील माहिती वाचून दाखविली. श्री. गणेश पाटील यांनी मोबाईल नेटवरील माहिती मुलांना दिली. या कार्यक्रमासाठी मा. प्राचार्य श्री. चंद्रकांत भोसले, सर्व शिक्षक वर्ग व विद्यार्थी उपस्थित होते.

**दि. १२ एप्रिल, २०१६ - डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त स्वच्छता अभियान** - डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त स्वच्छता अभियान सप्ताह राबविण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ वी जयंती असल्याकारणाने हे स्वच्छता अभियान राबविण्यात आले. शाळेचा परिसर तसेच सर्व खोल्यांची मुलांनी तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी मोठया उत्साहाने स्वच्छता केली. परिसर स्वच्छता केली. परिसर स्वच्छताही यावेळी करण्यात आली.

**दि. १४ एप्रिल, २०१६** - डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती - १४ एप्रिल, २०१६ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ वी जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली. घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला प्राचार्य श्री. चंद्रकांत भोसले यांच्या हस्ते पुष्पहार घालण्यात आला. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल माहिती सांगितली. यावेळी प्रशासकीय अधिकारी श्री. कृष्णा शेवाळे, प्राचार्य श्री. चंद्रकांत भोसले, सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

**दि. २१ जून, २०१६** - जागतिक योग दिन- जागतिक योग दिनाच्या निमित्ताने योगदिन साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांना आसनांचे प्रकार, सूर्यनमस्कार, कवायतीचे प्रकार इ. घेण्यात आले. या कार्यक्रमामध्ये सर्व विद्यार्थी व शिक्षकांचा सहभाग होता.

**दि. २३ जून, २०१६** - नेत्र तपासणी शिबीर - पुणे अंधजन मंडळ व एच.व्ही. देसाई हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने इ. १ ली ते इ. १० वी पर्यंत विद्यर्थ्यांची नेत्र तपासणी करण्यात आली. डॉ. निकिता बोके, डॉ. सुर्यकांत मदने, डॉ. शिवानी अतीक, डॉ. हर्षदा घुले इ. डॉक्टरांनी विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी केली. सोबत श्री. राजेंद्र सुतार व लक्ष्मण कोरवण उपस्थित होते.

**दि. २७/०६/२०१६** - दरवर्षी प्रमाणे या दिवशी डॉ. हेलन केलर जयंती व छत्रपती शाहू महाराज जयंती निमित्त प्रतिमेचे पूजन करुन सुत्र संचालन केले. सौ. संगिता माटे, श्री. गणेश पाटील व श्रीमती प्रतिभा कोरपे यांनी आपले मनोगत व्यकत केले.

**दि. २८/०६/२०१६** - या दिवशी कोरेगांवपार्क रहिवाशी संघाच्या वतीने महाराष्ट्र युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष डॉ. विश्वजीत कदम यांच्या शुभहस्ते गरजू वस्तूंचे वाटप करण्यात आले. या प्रसंगी शाळेचे प्रशासकीय अधिकारी श्री. कृष्णा शेवाळे, प्राचार्य चंद्रकांत भोसले, सामाजिक कार्यकर्ते श्री. जगताप, श्री. वाघचौरे तसेच सर्व शिक्षक व विदयार्थी उपस्थित होते.

**दि. ०१/०७/२०१६** - या दिवशी व्होडा फोन कंपनी, खराडी तर्फे वृक्षारोपण करण्यात आले. या प्रसंगी २५ झाडे लावण्यात आली. प्रमुख अतिथी (डीवायएसपी) निवृत्त अधिकारी मा. धनंजय सोनलकर तसेच राकेश वर्पे व त्यांचे सहकारी उपस्थित होते. या प्रसंगी प्रशासकीय अधिकारी श्री. कृष्णा शेवाळे प्राचार्य श्री. चंद्रकांत भोसले उपस्थित होते.

**दि. १४/०७/२०१६** - रोजी नॅब डॉ. मोडक सेंटर, नाशिक आणि कुसूमाग्रज प्रतिष्ठान तर्फे ग्रंथ तुमच्या दारी प्रकल्पा अंतर्गत अवांतर वाचन वृध्दीसाठी १०० सीडी (बोलकी पुस्तके) देण्यात आली. महाराष्ट्रातील सर्व अंध शाळेत हा उपक्रम राबविला जात आहे. या प्रसंगी माजी आमदार श्री.हेमंत टकले (अध्यक्ष) डॉ. मोडक सेंटर,

नाशिक, सचिव शाहिन शेख, समन्वयक विनायक राठोड (ग्रंथ तुमच्या दारी, कुसूमाग्रज प्रतिष्ठान) श्री. लक्ष्मीकांत खाबिया, विश्वस्त, खेळ सांस्कृतिक केंद्र, पुणे, श्री. पाडेकर साहेब इ.उपस्थित होते.

**दि. २०/७/२०१६**- गुरूपोर्णिमा या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. मनिषा शेवाळे यांनी केले. विदयार्थ्यांना गुरूपोर्णिमेबद्दल माहिती तसेच गप्पा गोष्टी, गाणी सादर केली. श्रीमती प्रतिभा कोरपे यांनी संतांच्या गोष्टी सांगितल्या.

**दि. २९/७/२०१६**- पुणे अंधशाळा मुलींची, कोथरूड या आपल्या संस्थेच्या शाखेच्या मुख्याध्यापिका सौ. माधुरी धोडपकर व पुणे अंधशाळा मुलांची येथील काळजी वाहक श्री. मधुकर डावरे यांच्या सेवानिवृत्तीचा कार्यक्रम झाला. सौ. संगिता माटे यांच्या सुश्राव्य गुरूवंदन स्तवनाने कार्यक्रमाची सुरूवात झाली. कार्यक्रमाचे अध्यक्षीय स्थान श्री. सुभाष करमरकर यांनी भूषविले.

**दि. ०१/०८/२०१६**- प्रतिवर्षाप्रमाणे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. मनिषा शेवाळे यांनी केले. इ. १ ली ते ७ वी तील विदयार्थ्यांनी भाषणे केली. कार्यक्रमाचे बाल सभेचे अध्यक्ष इ. ६ वी विदयार्थी किशोर कांबळे यांनी भूषविले.

**दि. १४/०८/२०१६**- या दिवशी रात्री ८.०० ते १०.०० विदयार्थ्यांचा जलसा हा कार्यक्रम साजरा झाला. त्यामध्ये नृत्य, गाणी, शायरी याचा आनंद सर्वांनी घेतला.

**दि. १५/०८/२०१६**- भारताचा ७० वा स्वातंत्र्य दिन सकाळी ८.०० ते ९.०० या वेळेत साजरा करण्यात आला. माजी महापौर निलेश मगर यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या प्रसंगी विदयार्थ्यांनी राष्ट्रगीत, समूह गीत, घुंगरू काठी कवायत इ. प्रकार सादर केले. विदयार्थ्यांची भाषणे झाली.

**दि. १६/०८/२०१६** - रोजी इंदिरा गांधी महिला बचत गट, स्वारगेट तर्फे सौ. संजिवनी बालगुडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी सर्व विदयार्थ्यांना राख्या बांधून खाऊवाटप करण्यात आले.

**दि. २२/०८/२०१६** - पुणे शहर कॉंग्रेस पक्षातर्फे रक्षाबंधन व खाऊवाटप करण्यात आले.

**दि. ३०/०८/२०१६** - इ. १ ली ते १० वी विदयार्थ्यांची शारिरीक तपासणी करण्यात आली.

**दि. ०५/०९/२०१६** - प्रतिवर्षाप्रमाणे या वर्षीही श्री गणेशाची प्रतिष्ठापना करण्यात आली. सर्वांनी गणेश उत्सवात आनंदाने सहभाग घेतला.

**दि. ०८/०९/२०१६** - खडकी येथील मिलेटरी संस्थेत आपल्या शाळेच्या विदयार्थ्यांचा ऑर्केस्ट्राचा कार्यक्रम झाला.

**दि. १८/०९/२०१६** - डी.ई.एस. शाळा, डेक्कन येथील चिन्मय मिशन तर्फे गीता पठण स्पर्धा झाल्या.

**दि. १३/०९/२०१६** - शाळेतील गणेश उत्सवात श्री. अजित लिलाणी यांचा ट्रॅक शो झाला. या प्रसंगी विदयार्थ्यांनी काही गाणी सादर केली.

**दि. १४/०९/२०१६** - श्री गणेशाचे विसर्जन करण्यात आले. या प्रसंगी सर्व कर्मचारी व विदयार्थी उपस्थित होते.

**दि. २९/०९/२०१६** - एच.व्ही. देसाई रूग्णालय, हडपसर, पुणे यांच्या वतीने डॉ. गणराज हाके, डॉ. राधिका दासानी, डॉ. वैभव पंडित, डॉ. प्राजक्ता घुले यांनी शाळेतील विदयार्थ्यांची नेत्र तपासणी केली. याप्रसंगी कु. योगिता दळवी व सर्व शिक्षक वर्ग उपस्थित होते.

**दि. ०२/१०/२०१६** - महात्मा गांधी जयंती निमित्त सर्व विदयार्थी व कर्मचाऱ्यांनी शाळेचा परिसर स्वच्छ करण्यात आला.

**दि. ०७/१०/२०१६**- शाळेतील सर्व विदयार्थ्यांना डॉ. किशोर कावेडिया यांनी डेंग्यू प्रतिबंधक लस देण्यात आली.

**दि. ०८/१०/२०१६**- सदाशिव पेठ, पुणे येथे स्काऊट ग्राऊंडवर गीतमंच कार्यक्रमाचे उद्घाटन माजी महापौर श्री. प्रशांत जगताप यांचे हस्ते झाले. या कार्यक्रमात १२ विदयार्थी सहभागी झाले होते.

**दि. १५/१०/२०१६**- शाळेत जागतिक पांढरी काठी दिन व राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम

यांचा जन्मदिन वाचन दिन म्हणून साजरा करण्यात आला.

**दि. २१/१०/२०१६-** दैनिक सकाळचा एन.आय.ई. चा अंक या वर्षी ब्रेल दिवाळी अंक सकाळ माध्यम समूहातर्फे प्रकाशित झाला. या प्रसंगी संस्थेचे सचिव मा.श्री. महेंद्र पिसाळ, दैनिक सकाळचे उपसंपादक श्री. माधव गोखले, इतर मान्यवर व शिक्षक व विदयार्थी उपस्थित होते. संस्थेच्या विश्वस्त मा.सौ. मृणाल पवार यांच्या प्रेरणेतून या अंकाची निर्मिती करण्यात आली.

**दि. १५/११/२०१६-** बालसमितीच्या वतीने पंडर्ती जवाहरलाल नेहरू यांचा जन्मदिन बालदिन म्हणून साजरा करण्यात आला.

**दि. २०/११/२०१६-** गीता धर्म मंडख सदाशिव पेठ, पुणे येथे पाच विदयार्थ्यांनी १ ते १८ अध्याय सलग म्हटले.

**दि. २१/११/२०१६-** डॉ.एस.आर. माचवे पुण्यतिथी निमित्ताने इ. १ली ते इ. १० वी तील विदयार्थ्यांसाठी विविध प्रकारच्या क्रिडा स्पर्धाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी प्रशासकीय अधिकारी श्री. कृष्णा शेवाळे, प्राचार्य श्री. चंद्रकांत भोसले सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विदयार्थी उपस्थित होते.

**दि. २२/११/२०१६-** इ. १ली ते इ. ७वी तील ७३ विदयार्थी चोखीदाणी येथे गेले होते. तेथे राजस्थानी नृत्य, संस्कृती तसेच उंटावर सफर, बैलाडीत बसणे, घोडागाडी व आगगाडीत बसण्याचा अनुभव आकाश पाळण्यात बसणे इ. आनंद विदयार्थ्यांनी घेतला.

**दि. २६/११/२०१६-** यादिवशी भारतीय संविधान दिन साजरा करण्यात आला. सर्वांनी सामूहिकरित्या संविधानाचे वाचन केले.

**दि. २९/११/२०१६-** महात्मा ज्योतिराव फुले यांची १२६ वी पुण्यतिथी साजरी करण्यात आली. इ. ६ वी तील विदयार्थी किशोर कांबळे याने छान माहिती सांगितली.

**दि. २९/११/२०१६-** जागतिक अपंग दिनानिमित्त बालकल्याण संस्थेने आयोजित केलेल्या लोकनृत्य स्पर्धेत आपल्या शाळेला प्रथम क्रमांक मिळाला. या नृत्यात १४ विदयार्थ्यांचा सहभाग होता. बानुबया हे धनगरनृत्य सादर करण्यात आले. या नृत्यास सौ. वर्षा रांका, श्री. गणेश पाटील, सौ. मनिषा शेवाळे, कु. हुमा समरीन शाह व श्री. अमृत लोखंडे यांनी मार्गदर्शन केले.

**दि. ३०/११/२०१६-** माजी विदयार्थी संघटना, पुणे तर्फे श्रीकांत भावे, स्मृती इंग्रजी संवाद स्पर्धा, २०१६ करिता इ. १० वी व इ. ८ वी तील विदयार्थी घेऊन उद्यान प्रसाद मंगल कार्यालय येथे प्राचार्य श्री. चंद्रकांत भोसले व श्री. गणेश पाटील गेले होते.

**दि. २/१२/२०१६-** पुणे जिल्हा परिषद समाज कल्याण विभागाच्या अपंग क्रिडा स्पर्धा दि. २/१२/२०१६ व दि. ६/१२/२०१६ रोजी झाल्या. अंध प्रवर्गातील क्रिडा स्पर्धेत २५ मी., ५० मी., १०० मी. धावणे, गोळाफेक, लांबउडी, बुध्दीबख, पोहणे यामध्ये एकूण ४० विदयार्थी सहभागी झाले. सर्व विदयार्थ्यांना श्री. राजाराम जगताप, श्री. राजेंद्र सुतार व श्री. गणेश पाटील यांनी मार्गदर्शन केले.

**दि. ३/१२/२०१६-** जागतिक अपंग दिनानिमित्ताने बालकल्याण, पुणे येथे विदयार्थी आनंद मेळाव्यासाठी गेले होते. प्राचार्य श्री. चंद्रकांत भोसले तसेच शिक्षक कर्मचारी व शिक्षकेतर कर्मचारी गेले होते. धान्य ओळखणे, स्मरणशक्ती, बादलीत चेंडू टाकणे, संगीत खुर्ची अशा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

**दि. ५/१२/२०१६-** बालगंधर्व रंगमंदिर येथे अपंग दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमास ५५ विदयार्थी गेले होते. यावेळी हिंदी गाण्यांचा ऑर्केस्ट्रा सादर करण्यात आला. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यावेळी विदयार्थ्यांसोबत उपस्थित होते.

**दि.६/१२/२०१६-** डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुण्यातिथी निमित्त कार्यक्रमास डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. विदयार्थ्यांनी विविध कविता वाचन केले. यावेळी सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

**दि. ८/१२/२०१६-** इ. ५वी ते इ. १० वी विदयार्थी व सर्व शिक्षक कर्मचारी यांनी व्यक्तीमत्व विकास व्याख्यानात सहभाग घेतला. संत गाडगे महाराज विदयालयातील ६० विदयार्थी तसेच शिक्षक कर्मचाऱ्यांनीही या व्याख्यानात सहभाग घेतला. सकारात्मक विचार प्रणालीचे महत्व प्रात्यक्षिकासह पटवून देण्यात आले.

**दि. १६/१२/२०१६-** पुणे बिनाले तर्फे

बालकल्याण संस्थेत चित्रकला कार्यशाळा आयोजित केली होती. ५ विदयार्थी व सौ. वर्षा रांका यांनी यामध्ये सहभाग घेतला होता. या कार्यशाळेत डुडल पेंटींग, मातीकाम, फ्री पेंटींग, मातीकाम, कागदी मुखवटे इ. बाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच चाईल्ड लाईन सेवाभावी संस्थेमध्ये डॉ.सौ. मधुरा कामत यांनी विदयार्थ्यांना बाल लैंगिक शोषण प्रतिबंधक उपाय व विषयावर जाणीव जागृती निर्माण करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या प्रसंगी प्रशासकीय अधिकारी श्री. कृष्णा शेवाळे, प्राचार्य श्री. चंद्रकांत भोसले सर्व शिक्षक, विदयार्थी उपस्थित होते.

**दि. १७/१२/२०१६-** स्काऊट गाईड, सदाशिव पेठ, पुणे येथे चार विदयार्थ्यांनी पाककला स्पर्धेत सहभाग घेतला सौ. मनिषा शेवाळे आदि उपस्थित होते.

**दि. २१/१२/२०१६** ते दि. १०/०१/२०१७ पर्यंत स्काऊट विदयार्थ्यांनी खरी कमाई पंधरवडा करून जास्तीत जास्त रक्कम जमविण्याचा प्रयत्न केला.

**दि. ०३/०१/२०१७** सावित्रीबाई फुले जयंती- सौ. संगिता माटे, श्रीमती कोरपे, श्री. सरगम, सौ राऊत व विदयार्थी मिळून सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला हार घातला माहिती सांगितली.

**दि.०४/०१/२०१७-** रोजी लुईस ब्रेल जयंती निमित्त विविध स्पर्धा घेण्यात आल्या मराठी, इंग्रजी ब्रेलवाचन, लेखन इ. स्पर्धा घेण्यात आल्या व लुईस ब्रेल यांच्या प्रतिमेला हार घातला माहिती सांगितली.

**दि. १०/०१/२०१७-** डॉ. माधुरी कश्यप, श्री. सतिश मराठे, नुतन इनामदार, यांनी हिंदी मराठी चित्रपट गीते सादर केली. या प्रसंगी प्रशासकीय अधिकारी श्री. कृष्णा शेवाळे, प्राचार्य श्री. चंद्रकांत भोसले सर्व शिक्षक, विदयार्थी उपस्थित होते.

**दि. १४/०१/२०१७-** गणेश कला क्रिडा मंदिर येथे लिओ क्लब ऑफ नेचर

लवर तर्फे एपिक फेस्टीवल साठी इ. ३री ते ४ थी विदयार्थी गेले होते या कार्यक्रमात शाळेतील विदयार्थ्यांनी ऑर्केस्ट्रा सादर केला. तसेच मॅजिक शोचा आनंद घेतला.

**दि. १६/०१/२०१७-** वाहतूक सुरक्षा पंधरवडया निमित्त कोरेगांवपार्क वाहतूक शाखा पुणे अंधशाळा मुलांची व श्री संत गाडगे महाराज शाळा यांच्या वतीने वाहतूकीच्या नियमांचे प्रबोधन करण्यासाठी डॉ. एस.आर. माचवे रस्ता ते बंड गार्डन दरम्यान रॅली काढण्यात आली, या रॅलीमध्ये हेल्मेट वापरा व इतर वाहतूक नियमांचे संदेश व घोषणा ही दिल्या. या प्रसंगी कोरेगांवपार्क वाहतूक पोलिस निरीक्षक एस.टी. पाटील, सहाय्यक पोलिस निरिक्षक श्री. संतोष खोतमाळस, पोलिस उपनिरीक्षक श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे, शाळेचे प्रशासकीय अधिकारी श्री. कृष्णा शेवाळे प्राचार्य श्री. चंद्रकांत भोसले, सर्व शिक्षक, विदयार्थी उपस्थित होते.

**दि. २३/०१/२०१७-** स्काऊट ग्राऊंड येथे झालेल्या कथाकथन स्पर्धेत इ. ७ वी तील किशोर कांबळे याने मी रायगड बोलतोय या विषयावर आत्मकथन सादर केले. या स्पर्धेत व्दितीय क्रमांक मिळाला. सौ. मनिषा शेवाळे यांनी त्यास मार्गदर्शन केले.

**दि. २६/०१/२०१७-** प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. मा.श्री. संजय गावडे, सहआयुक्त, पुणे म.न.पा. हे प्रमुख पाहुणे लाभले होते. पाहुण्यांची ओळख व प्रास्ताविक प्रशासकीय अधिकारी श्री. कृष्णा शेवाळे यांनी केले. पाहुण्यांचे हस्ते ध्वजारोहण झाल्यानंतर विदयार्थ्यांनी राष्ट्रगीत, ध्वज प्रतिज्ञा व झेंडागीत सादर केले. लुई ब्रेल जयंती, डॉ. माचवे पुण्यातिथी व जागतिक अपंग दिनानिमित्त घेतलेल्या विविध स्पर्धेचा बक्षिस समारंभ प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते व पालकांच्या हस्ते झाला.

**दि. २७/०१/२०१७-** स्काऊट विदयार्थ्यांचा निवासी शेकोटी कॅम्प खानापूर येथील सह्याद्री विकास मंडळाच्या निसर्गरम्य सेवा शिबीर परिसरात उत्साहात पार पडला. मुलांमध्ये स्वावलंबन, श्रमदान, व्यवस्थापन कौशल्य, सहकार्य भावना, व्यायामाची आवड या सारख्या विविध कलागुणांचा विकास करण्याच्या दृष्टिने शिबीरात विविध उपक्रम राबविण्यात आले.

**दि. ३०/०१/२०१७-** हुतात्मा दिना निमित्ताने प्रार्थनेच्या वेळी २ मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली वाहिली. या वेळी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सौ. संगिता माटे यांनी विदयार्थ्यांना या दिवसाचे महत्व सांगितले.

**दि. ०४/०२/२०१७ -** मुकूल जाधव फाऊंडेशनव्दारे जे.डब्ल्यू. मेरीट हॉटेल मध्ये दृष्टिहीन विदयार्थ्यांसाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात आपल्या शाळेतील मुलांनी नृत्य

होते. या कार्यक्रमात आपल्या शाळेतील मुलांनी नृत्य सादर केले. सुप्रसिध्द सिनेकलाकार ऋषी कपूर, कानिका कपूर या कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

